# प्रेमाच्या जाळ्यात ओढून डॉक्टरकडून १४ लाखांची खंडणी उकळली

## महिलेविरोधात गुन्हा दाखल



(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**पुणे** – पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात एका डॉक्टरांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांच्याकडून तब्बल १४ लाख ३० हजार रुपयांची खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित महिलेने डॉक्टरांच्या रुग्णालयातील कागदपत्रांची नोंद असणारी वही चोरून नेली व ती परत करण्यासाठी आणखी १० लाख रुपयांची खंडणी मागितली आहे.

या ब्लॅकमेलिंगला कंटाळून डॉक्टरांनी पोलिसांत धाव घेतली असून, विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित डॉक्टरांचा धानोरी येथील भैरवनगर परिसरात स्वतःचा दवाखाना आहे. काही काळापूर्वी आरोपी महिला रोहिणी सुकुमार खेमाणे हिची डॉक्टरांशी ओळख झाली होती.

# जनता इंग्लिश स्कूल येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता शिक्षण संस्थेद्वारा संचालित जनता इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

यानिमित्त विद्यार्थ्यांनी दोन्ही महान नेत्यांच्या जीवनकार्याची माहिती जाणून घेत त्यांच्या विचारांचे प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमात महात्मा गांधी यांच्या भूमिकेत पार्थ अकर्ते तर लाल बहादूर शास्त्री यांच्या भूमिकेत विराज खेरडे यांनी आकर्षक वेशभूषेत उपस्थित राहून प्रभावी भाषणे सादर केली. त्यांच्या सादरीकरणातून गांधीजींचा सत्य व अहिंसेचा मार्ग तसेच लाल बहादूर शास्त्री यांची साधी राहणी, प्रामाणिकपणा आणि देशसेवेची भावना विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडण्यात आली. यावेळी प्रथमेश सावरकर, ओवी शिंगरवाडे, भाविका कानडे आणि गार्गी गोरडे यांनीही महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या विचारांवर आधारित मनोगते व माहिती सादर केली. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सत्य, अहिंसा, स्वच्छता, साधेपणा, देशप्रेम आणि देशसेवेचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दोन्ही महान नेत्यांच्या जीवनकार्याची ओळख झाली. त्यांच्या विचारांमधून विद्यार्थ्यांना देशप्रेम, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका जयश्री आंडे तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## 'स्वच्छ भारत'चा संदेश घेऊन अमरावती ते पचमढी प्रवास करणाऱ्या

# सायकलस्वारांच्या चमुची स्कूल ऑफ स्कॉलर्स सदिच्छा भेट

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**वरुड** – महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री जयंतीच्या औचित्याने 'स्वच्छ भारत'चा संदेश घेऊन अमरावती ते पचमढी प्रवास करणाऱ्या सायकलस्वारांच्या चमूने स्कूल ऑफ स्कॉलर्स, वरुड येथे सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी प्राचार्य सुनीतकुमार दुबे आणि उपप्राचार्या रिया तिडके यांचे हस्ते सर्व रायडर्सचा सत्कार करण्यात आला. या स्वच्छता जनजागृती रॅलीचे कौतुक करत त्यांनी रायडर्सना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे स्वागत व अल्पोपहाराची व्यवस्था शैक्षणिक समन्वयक रुपाली काळे आणि क्रीडा शिक्षक निलेश विधाते यांनी सांभाळली तर संपूर्ण कार्यक्रमाची व्यवस्था प्रशासकीय अधिकारी सुशील उघाडे यांनी केली. यावेळी वरुड सायकलिंग असोसिएशन तर्फे डॉ.विजय देशमुख, देवानंद मेश्राम, पियुष खंडेलवाल आणि चंद्रकांत चांगदे उपस्थित राहून अमरावतीच्या रायडर्सचे स्वागत केले. या रॅलीमध्ये सहभागी असलेले रायडर्स नितीन अंबरे, राजेंद्र महाजन, दिनेश नार्सु, विनोद वानखडे, नरेंद्र कुरेकर, संतोष सरोडे, राजकुमार आंबेडकर, प्रसाद पंत, बकुल सर, महेश गटानी आणि धनराज मेश्राम यांनी 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' चा संदेश दिला. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता आणि सायकलिंगच्या माध्यमातून फिटनेसबद्दल जनजागृती निर्माण झाली.

# सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली

## स्व.इंदिराबाई देशमुख विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र काकडे यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरुड** – महात्मा गांधींनी सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. सत्याग्रह, स्वदेशी आणि स्वावलंबनाचा संदेश देत त्यांनी सामान्य जनतेला स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करुन घेतले. त्यांचे जीवन आपल्याला सत्य, अहिंसा आणि मानवतेची शिकवण देते, असे प्रतिपादन स्व.इंदिराबाई देशमुख विद्यालयाचे राजेंद्र काकडे यांनी केले.

ते येथून जवळच असलेल्या अमडापुर येथील स्व.इंदिराबाई देशमुख विद्यालय येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, त्यावेळी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, लालबहादूर शास्त्री हे अत्यंत साधे, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ नेते होते. देशाच्या कठीण काळात त्यांनी जय जवान, जय किसान हा प्रेरणादायी संदेश दिला. जवान आणि शेतकरी हे देशाच्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत, हा विचार त्यांनी देशासमोर मांडला.

या दोन्ही महान व्यक्तींचे जीवन आपल्याला देशप्रेम, प्रामाणिकपणा, शिस्त आणि समाजसेवेची प्रेरणा देते. त्यांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावा, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजेंद्र काकडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन सहायक शिक्षक अरविंद बहुरुपी व सुखदेव पखाले उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन जे.बी.पाटील यांनी तर आभार के.व्ही.वाघ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी एम.बी.धुर्वे, व्हि.बी.साबळे, एन.पी.अढाऊ, वैष्णवी सुपले, सिमा सावंत व समिक्षा काकडे यांचे सहकार्य लाभले.

# एमपीएससीच्या आजी-माजी अध्यक्षांची न्यायालयीन चौकशी

## मुख्यमंत्री फडणवीस यांची राज्यपालांना शिफारस

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्यासह माजी अध्यक्ष आणि सदस्यांच्या विरोधातील तक्रारींची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्याकडे केली आहे. औषध निरीक्षक पदाची प्रश्नपत्रिका फुटल्यापासून एमपीएससीच्या कारभाराविरोधात पुण्यात विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारले आहे. पेपरफुटीप्रकरणी आंदोलकांनी एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना हटविण्याची मागणी लावून धरली आहे. मात्र, पेपरफुटीची घटना भीमनवार यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वीची आहे. तसेच, आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांना पदावर हटविण्यासाठी घटनेच्या कलम ३१७ नुसार न्यायालयीन प्रक्रिया पार पाडावी लागते. त्यामुळे अशा चौकशीची शिफारस करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी ३० सप्टेंबर रोजी एमपीएससी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाला दिली होते.

## डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची

# रायफल शूटिंगमध्ये विभागीय स्तरावर निवड

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्थेअंतर्गत संचालित डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत दमदार कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे.

या स्पर्धेत ४ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदकांची कमाई करत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात यज्ञेश सावरकर आणि दर्शिका शेंडे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. १७ वर्षे वयोगटात सार्थकी देशमुख हिने सुवर्णपदक मिळविले, तर १९ वर्षे वयोगटातील रायफल शूटिंग स्पर्धेत कृष्णा वानखडे याने सुवर्णपदकाची कमाई केली. या चारही विद्यार्थ्यांची आता विभागीय स्तरावरील रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, त्यांच्या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी भर पडली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शक यशपाल दवंडे आणि क्रीडा शिक्षक शुभम कडू यांना दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि सातत्यपूर्ण सरावामुळे हे यश मिळविता आल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. या यशाबद्दल नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका नीता चिमोटे, आदर्श मराठी प्रायमरीचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे, सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने जि.प.प्राथमिक शाळा पांढरघाटी येथे

# विविध सामाजिक उपक्रम उत्साहात साजरे

(प्रतिनिधी वरूड दर्पण)






**वरुड** – सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने जि.प.प्राथमिक शाळा पांढरघाटी येथे विविध सामाजिक उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खडकाचे सरपंच राहुल फुले तर प्रमुख अतिथी म्हणुन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश परतेती, मुख्याध्यापक सुधीर कांबळे, पोलीस पाटील विजय इडपाची, माजी ग्रा.पं.सदस्य सुखदेव कोडापे, येवलेश्वर चरपे, दुपारे, माधव परतेती, पालक वर्ग व गावातील नागरिक उपस्थित होते. मुख्याध्यापक सुधीर कांबळे यांनी प्रास्तविकातून सेवा संकल्प अभियान विषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी राहुल फुले यांनी सुद्धा हा उपक्रम सेवा व समर्पण या भावनेतून राबवुन यशस्वी करण्याकरिता सर्वांच्या सहभागाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या अभियानाअंतर्गत शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी एकत्र येऊन गाव परिसराची स्वच्छता मोहीम हाती घेतली. रस्ते, सार्वजनिक ठिकाणे व शाळा परिसरातील कचरा साफ करून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व सांगणारे फलक व घोषवाक्ये हातात घेऊन जनजागृती रॅलीही काढली. तसेच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. खडका-पांढरघाटीचे सरपंच राहुल फुले व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळा परिसरात व गावातील मोकळ्या जागांमध्ये विविध प्रकारची रोपे लावण्यात आली. या रोपांची निगा राखण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारून पर्यावरण संरक्षणासाठी आपला सहभाग नोंदविला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे पांढरघाटी गावात स्वच्छता व पर्यावरणा बाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. त्याच प्रकारे यावेळी कोठारा लेप्रसी मिशनचे समन्वयक येवलेश्वर चरपे व दुपारे यांनी कुष्ठरोग विषयीची जनजागृती बाबत माहिती दिली. उपस्थित शेतकऱ्यांना जैविक शेती विषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना विकसित झाली असून स्वच्छ व हरित ग्रामनिर्मितीकडे एक सकारात्मक पाऊल टाकण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहा. शिक्षिका सारिका ठाकरे, अंगणवाडी सेविका उषा धुर्वे, आशा कामगार माला आहाके, बेबी कंगाले, लीला मोरले, मालती आमोदे, सीता इडपाची, मनीष परतेती, विवेक मरसकोल्हे, गौतम आमोदे आदींचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन सहा.शिक्षिका सारिका ठाकरे तर सहाय्यक शिक्षिका सारिका ठाकरे यांनी उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.